MHST200000812020

## नि.दि.दा.क्र.३/२०२३ मधील निशाणी क्र.१२२ वरील आदेश

प्रतिवादी क्रं. ४अ व ४ड यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रं.४अ व ४ड हे वेगवेगळया ठिकाणी राहणेस असुन त्यांना नोटीस मिळाल्याचे प्रतिवादी क्रं.७ यांना सांगितले. त्यावरुन नोटीस मिळाल्यानंतर न्यायालयात नव्याने हजर व्हायचे असते याबाबतची कल्पना सदर प्रतिवादी यांना नसल्याने व नोटीसची कल्पना वकिलांना न दिल्यामुळे त्यांचेविरुद्ध उलटतपास नाही असा हुकूम झालेला आहे. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली की, त्यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही हुकूम रद्द करणेत येवुन सदर प्रतिवादी यांना उलटतपास घेणेस परवानगी मिळावी.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे देवुन अर्जातील संपुर्ण कथने नाकारली. त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी यांना पुर्वीपासुनच दाव्याची माहिती होती. तसेच त्यांना सदरचे प्रकरण दोन वर्षापासुन वाई येथे वर्ग झालेची माहिती होती. सदरची माहिती असुनही त्यांनी जाणीवपुर्वक काम लांबविणेचे हेतुने प्रतिवादी हजर झालेले नाहीत. वादी हे वयोवृद्ध इसम असुन ते नियमीत तारखेस हजर राहतात. वादी यांनी दि.०१.१०.२०२१ रोजी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन सदरचे प्रकरण ४ वर्षे उलटतपास घेणेकरीता प्रलंबीत आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज रक्कम रुपये १०,०००/- खर्च लादुन फेटाळण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान

विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. सदर दावा जाहीर ठराव, कब्जा व निरंतर मनाईसाठी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रतिवादींविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास दाव्यातील सर्व वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर होण्यास मदत होणार आहे. वाद मुद्दयांचे निवारण गुणावगुणांवर झाल्यास उभय पक्षकारांदरम्यान असलेला वाद कायमस्वरुपी संपणार आहे. उलटतपास नाही आदेश रद्द केल्यास वादीचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. प्रतिवादी क्रं.४अ व ४ड हे दि.२४.०६.२०१९ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांचेविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश दि.०६.०८.२०२५ रोजी झालेला आहे. सदरचा अर्ज दि.१९.०८.२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना उलटतपास नाही आदेश रद्द करण्यासाठी विलंब झालेला आहे असे दिसुन येते. त्यामुळे, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## आदेश

१) अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.४अ व ४ड यांनी खर्चाची रक्कम रुपये ३००/- (रक्कम रुपये तिनशे फक्त) वादीला दयावेत.

३) वरील खर्चाची पुर्तता झालेनंतर प्रतिवादी क्रं.४अ व ४ड यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाही आदेश रद्द करणेत येतो.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.09.08 17:38:14 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०२.०९.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.